माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२३/M/००११०६**

**अपिलार्थी डॉ. मनोहर भिकाजी रावते**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी, श्रेणी-१**

उपनिबंधक, सहकारी संस्था, के/पूर्व विभाग, मुंबई, बि.नं.अे/१, रु.नं.३१५,
तिसरा मजला, वडाळा ट्रक टर्मिनल, आर.टी.ओ.ऑफिसजवळ,
वडाळा (पूर्व), मुंबई-४०० ०३७

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप निबंधक**

उपनिबंधक, सहकारी संस्था, के/पूर्व विभाग, मुंबई, बि.नं.अे/१, रु.नं.३१५,
तिसरा मजला, वडाळा ट्रक टर्मिनल, आर.टी.ओ.ऑफिसजवळ,
वडाळा (पूर्व), मुंबई-४०० ०३७

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०६.११.२०२४**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २८.०९.२०२२ | २०.१०.२०२२ | २०.१२.२०२२ | १३.०३.२०२३ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २६.०४.२०२३ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २०.१०.२०२२ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. १३.०३.२०२३ संलग्न केले आहेत.

अर्जदाराने चार मुद्दयांवर त्यांच्या दिनांक २८.०९.२०२२ चे अर्जान्वये माहिती विचारली होती.

जन माहिती अधिकारी यांचेकडून कोणतेही उत्तर प्राप्त न झाल्याने त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी मुद्दा क्रमांक A, C व D प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती असल्याने तसेच माहितीचे अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या माहितीच्या व्याख्येत समावेश होत नसल्याने अपील अंशत: मान्य करुन उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविण्यात यावी, असे आदेशीत केले.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानंतर सुध्दा जन माहिती अधिकारी यांचेकडून कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त झालेली नसल्याने अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्ज दाखल केला. द्वितीय अपिलाच्या सुनावणीस अपिलार्थी व तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दि. ०५.११.२०२४ चे लेखी निवेदन व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे दि.०५.११.२०२४ चे लेखी निवेदन आयोगास सादर केले. अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे निवेदनात नमूद केले आहे की, मुद्दा क्रमांक A, C व D बाबत माहितीच्या अधिकारांतर्गत माहिती देता येत नाही.

उपलब्ध अभिलेखावरुन स्पष्ट होते की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांना कोणतेही उत्तर दिलेले नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानंतर सुध्दा त्यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेकडे त्यांची ऑक्टोंबर, २०२३ मध्ये बदली होण्यापूर्वी ०५ महिन्यांचा कालावधी उपलब्ध होता. परंतू या दरम्यान तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही. सदर विषयी आयोगाकडून त्यांचेवर शास्ती का लावण्यात येऊ नये, असे विचारणा केल्यावर त्यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. ०६.११.२०२४ आयोगास सादर केले जिथे की त्यांनी नमूद केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांना १० मिनिटे थांबण्यास विनंती केली होती जेणे करुन त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे शक्य होईल. परंतू अपिलार्थी कोणतीही कल्पना न देता कार्यालयामधून निघून गेले.

जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण मान्य करण्यासारखे नाही. जरी अपिलार्थी प्रत्यक्ष कार्यालयात थांबले नाहीत तरी त्यांना पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देणे निश्चितपणे शक्य होते. तसेच आज सुनावणी दरम्यान सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी माहिती सोबत आणलेली नाही. यावरुन श्री. गणेश सावर्डेकर, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक सहकारी अधिकारी यांनी माहिती अधिकारांतर्गत अर्ज हाताळताना केलेले दुर्लक्ष स्पष्ट आहे. म्हणून आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेश प्राप्तीच्या १० दिवसात अपिलार्थींना अपेक्षित माहिती नि:शुल्क, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.**

**२. प्रकरणातील वस्तुस्थिती व परिस्थिती लक्षात घेता, या प्रकरणात,श्री. गणेश सावर्डेकर, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक सहकारी अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये रु. ५,०००/- (रुपये पाच हजार मात्र) एवढी शास्ती करण्यात येत आहे.सदरची शास्ती त्यांच्या मासिक वेतनातून पाच समान हप्त्यात वसूल करण्यात यावी व शासन परिपत्रक सा.प्र.वि. दिनांक ०९.०५.२००७ व शासन सा.प्र.वि. शुध्दिपत्रक दिनांक २८.०५.२००७ मध्ये नमूद केलेल्या पुढील लेखाशीर्षाखाली जमा करावी.**
**००७०-इतर प्रशासनिक सेवा**
**६० इतर सेवा, ८०० इतर जमा रकमा**
**(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१).**

**शास्तीचा भरणा विहित मुदतीत करून विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांनी आयोगाला अनुपालन अहवाल पाठवावा.**

**३. अपील निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास 7-11-2024

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०७.११.२०२४**

State Information Commission Greater Mumbai